**प्रेसनोट** **दि.०९/०४/२०१९**

## विश्रांतवाडी पोलीस स्टेशन पुणे.

## तब्बल ४० वर्षा पासुन गंभीर गुन्हा असलेला फरार आरोपीस केली अटक

विश्रांतवाडी पोलीस स्टेशनकडील गु.र.नं.३८/१९७९ भा.द.वि.क. ३२६ मधील फरारी आरोपी नामे वामन बहीरु तिखे वय-७७ वर्ष रा.औंध पुणे.हा तब्बल ४० वर्षापासुन पोलीसांना गुंगारा देऊन स्वताचे अस्तित्व लपवुन बसलेला शरीरा विरुध्द गंभीर गुन्हा असलेला फरारी आरोपी याचा अनेक वर्षा पासुन शोध घेतला असता तो मिळुन येत नव्हता सदरचा आरोपी हा कोणालाही न सांगता वेगवेगळ्या नातेवाईकांच्या पत्यांवर राहुन आपले अस्तित्व लपवत होता.सदर फरार आरोपी हा औंध येथे असल्याची गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर बातमी पो.शि.अनिकेत भिंगारे व पो.हवा.प्रवीण राजपुत यांना मिळताच तात्काळ सदर ठिकाणी जावुन तेथील स्थानिक लोकांकडुन तसेच गुप्त बातमीदारा कडुन वारंवार माहीती घेऊन फरारी आरोपीला शिताफीने ताब्यात घेण्यात आले आहे.

सदरची कामगीरी ही मा.श्री.सुनिल फुलारी अप्पर पोलीस आयुक्त,श्री. प्रसाद अक्कानवरु पोलीस उप आयुक्त परी -०४ पुणे शहर,श्री.देविदास पाटील सहा.पो.आयुक्त खडकी विभाग पुणे.यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.अरुण आव्हाड वरिष्ठ पो.निरिक्षक विश्रांतवाडी पो.स्टे.पुणे, तसेच पो.उप-निरिक्षक अभिजित चौगुले, पो.हवा.प्रवीण राजपुत,म.पो.ना.सुरेखा हिले,पो.शि.अनिकेत भिंगारे यांनी पार पाडली..